• बीनच्या धुनीवरचे गाजलेले पहिले गीत 'इक परदेसी' संगीतात आशाला वगळून गीता दत्तला प्राधान्य.

फागुन(१९५८):

सोने की चिडियां, *रागिनी*बरोबरच ओ. पी. नय्यरनी संगीतबद्ध केलेला १९५८चा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे *फागुन*. बिभूती मित्रा या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. १९४९ साली बिभूती मित्रांनी फिल्मीस्तानसाठी एक चित्रपट दिग्दर्शित केला होता *शबनम*. या चित्रपटाची कथाच थोडीफार बदलून विभूती मित्रांनी *फागुन*मध्ये सादर केली होती. *शबनम*ची पार्श्वभूमी जिप्सी लोकांच्या जीवनाची होती. *फागुन*ची पार्श्वभूमी देखील हीच होती आणि *शबनम*मध्ये खलनायकाची भूमिका करणाऱ्या जीवनने *शबनम*ची आपली खलनायकाची भूमिका *फागुन*मध्ये पुन्हा जशीच्या तशी साकार केली होती. *शबनम*च्या काळात कक्कू आपल्या चित्रपटातील लोकप्रिय नृत्यतारका होती आणि या चित्रपटातील 'कदम मेरी न जानी, छोड के जानेवाले', 'देखो आई पहली मुहब्बत की रात' या गाण्यावर तिने धमाल नृत्ये केली होती.

*फागुन*च्या वेळी *शबनम*च्या वेळचा कक्कूचा जमाना संपला होता. हेलन, मिनू, मुमताज, शीला वाज, कुमकुम, कम्मो यासारख्या नृत्यतारका तिच्याजागी आल्या होत्या. पण बिभूती मित्रांच्या चित्रपटातून मात्र कक्कू लुप्त झाली नव्हती. कारण त्यांच्या जीवनात तिने तेव्हा स्फूर्तीदेवतेचे स्थान मिळवले होते आणि यामुळे निशीबरोबरच तिचे एक नृत्य या चित्रपटात त्यांनी समाविष्ट केले होते. आशाबाईंनी कोरसबरोबर गायलेल्या 'शोख शोख आँखे तुझको बुला रही है' या गाण्यावर कक्कू या चित्रपटात निशीबरोबर नाचली होती.

*शबनम*चा नायक होता दिलीपकुमार आणि नायिका कामिनी कौशल. *फागुन*मध्ये या भूमिका भारत भूषण व मधुबाला यांनी साकार केल्या होत्या. *शबनम*मध्ये दिलीपकुमारच्या हाती पुंगी म्हणजे बीन होती. पण १९५४च्या *नागिन*नंतरची बीन संगीताची क्रेझ तेव्हा निर्माण झालेली नव्हती. यामुळे या चित्रपटाच्या संगीतात बीन फारशी वाजली नाही. पण *फागुन*मध्ये ओ. पी. नय्यरनी बीनचा अगदी मुक्तपणे वापर केला होता. आशा व रफी यांनी गायलेले 'इक परदेसी मेरा दिल ले गया, जाते जाते मीठा, मीठा गम दे गया' हे या चित्रपटातील गाणे तर बीनच्या संगीतावरच फुलले होते. *शबनम*चे संगीतकार होते एस. डी. बर्मन. *फागुन*मध्ये त्यांच्या ऐवजी ओ. पी. नय्यर यांचे संगीत आले होते. पण म्हणून विभूती मित्रांनी या चित्रपटात गीतकार बदलला नव्हता. *शबमन*ची गाणी लिहिणाऱ्या कमल जलालाबादी यांच्याकडूनच या चित्रपटाची गाणी त्यांनी लिहून घेतली होती आणि ती ओ. पी. नय्यरनी या चित्रपटात रफी व आशा या दोघांच्या आवाजातच फुलवली होती.

'तीर यह छुप के चलाया किसने', 'पिया पिया न लागे मोरा जिया, आ जा चोरी चोरी', 'छुन छुन घुंघरू बोले, मेरी चाल नशीली डोले', 'सुन जा पुकार, सुन जा पुकार बीत न जाये यह बहार' ही या चित्रपटातील पाच गाणी आशाबाईंनी एकटीने गायली होती. तर 'शोख शोख आँखे तुझको बुला रही है' व 'और तो कोई नहीं सहारा, बरसों रे हाय बैरी बदरवा बरसो रे' ही दोन गाणी कोरसबरोबर रफीचा आवाज या चित्रपटातील गायकाचा आवाज होता. पण त्यांच्या वाट्याला या चित्रपटात एकही सोलो गाणे आलेले नव्हते. 'मैं सोया अंखिया मीचे, तेरे जुल्फों के नीचे', 'इक परदेसी मेरा दिल ले गया', 'तुम रूठ के मत जाना, मुझसे क्या शिकवा, दीवाना है दीवाना', 'जा, जा, जा मेरी छोड दे कलाई सैंया जा', 'बना दे बना दे प्रभूजी तू बिगरी गरीब की बना दे प्रभूजी' ही या चित्रपटातील पाच गाणी रफीने आशाबाईंच्याबरोबर गायली होती.

या चित्रपटात एकूण अकरा गाणी होती आणि या अकरा गाण्यात आशाबाईंचा आवाज नाही असे एकही गाणे या चित्रपटात नव्हते. *फागुन*मधील ओ. पी. नय्यरच्या संगीताचे हे एक ठळक वैशिष्ट्य होते.

हावडा ब्रिज(१९५८):

१९५७ च्या *बारिश*मधील 'मिस्टर जॉन बाबा खान', *आशा*मधील 'इना मीना डीका' या गाण्यांच्यानंतर आशाबाईंचा आवाज रॉक एन रोल संगीतातील गाण्यांना ज्या आवाजाला पर्याय नाही असा एक आवाज बनला होता आणि या गाण्यांच्या काळात त्यांचा आवाज हळुहळू ओ. पी. नय्यर यांचे संगीत व्यापत चालला होता. तरीही १९५८च्या *हावडा ब्रिज* या चित्रपटात एक रॉक एन रोल गाणे करताना ओ. पी. नय्यरनी या गाण्यात आशाबाईंचा आवाज मात्र वापरला नाही. १९५४च्या *आरपार* या चित्रपटापासून त्यांच्या संगीतात क्लब संगीत फुलवणाऱ्या गीता दत्तचा आवाज वापरला. 'मेरा नाम चिन चिन चू' या गाण्यात. गीता दत्तचा आवाज या अशा गाण्यात कोठे कमी नाही ही गोष्ट या गाण्याने दाखवून दिली. *बारिश*मधील 'मिस्टर जॉन बाबा खान' या गाण्यावर हेलन धम्माल नाचली होती आणि तीच धम्माल तिने *हावडा ब्रिज*मधील या रॉक एन रोल गाण्यावरील नृत्यात देखील केली होती. तिच्याबरोबर या चित्रपटाचे नृत्यदिग्दर्शक सूर्यकुमार या गाण्यात तिच्याबरोबर नाचले होते.



ओ. पी.

*बारिश*मधील 'मिस्टर जॉन बाबा खान' हे रॉक एन रोल गाणे तयार करताना संगीतकार सी. रामचंद्र यांनी *बेदिंग ब्युटी* या इंग्रजी चित्रपटातील ट्रम्पेटच्या एका संगीताच्या तुकड्यातून प्रेरणा घेतली होती. 'मेरा नाम चिन चिन चू' या रॉक एन रोल गाण्याची प्रेरणा देखील नय्यरनी *बेदिंग ब्युटी* या इंग्रजी चित्रपटातील एका संगीताच्या तुकड्यातूनच घेतली होती आणि कमालीची द्रुतगती हे या गाण्यातील त्यांच्या संगीताच वैशिष्ट्य होतं. 'मेरा नाम चिन चिन चू' हे गाणे गीता दत्तच्या आवाजात फुलवताना ओ. पी. नय्यरनी *हावडा ब्रिज*मध्ये तिचा आवाज या एका गाण्यापुरताच मर्यादित ठेवला होता. शमशादचा आवाजदेखील नय्यरनी या चित्रपटातील एका गाण्यात घेतला होता. पण तो सोलो गाण्यात मात्र नव्हे. 'मैं जान गई तुझे सैय्या, हट छोड दे मोरी बईयां' हे या चित्रपटातील द्वंद्वगीत शमशादने

मेरा...' • हावडा ब्रीजमध्ये रॉक एन रोल गाण्यासाठी ओपींच्या • बारह बजेमध्येही ओपींनी आशाला चाट दिली. — — — □ इसाक मुजावर

रफीबरोबर गायले होते आणि ते हास्य अभिनेता सुंदर व नृत्यतारका कम्मो यांच्यावर चित्रीत करण्यात आले होते. गीता दत्त व शमशाद यांच्या एका गाण्याचा अपवाद वगळता या चित्रपटातील गायिकेच्या बाकीच्या गाण्यात आशाबाईंचा आवाजच प्रमुख आवाज होता. 'यह क्या कर डाला तूने दिल तेरा हो गया' व 'आईये मेहरबां बैठीये जाने जा' ही दोन गाणी आशाबाईंनी एकटीने गायली होती. यापैकी 'यह क्या कर डाला तूने' या गाण्यात नय्यरनी शिटीच्या



आशा



गीता दत्त

र्‍हिदमचा कल्पकतेने उपयोग केला होता. अशोककुमार व मधुबाला या दोघांच्यावर हे गाणे चित्रीत करण्यात आले होते. अशोककुमारच्या तोंडी या चित्रपटात एकही गाणे नव्हते. पण 'यह क्या कर डाला तूने' या गाण्यातील शिटीचा आवाज मात्र मधुबालाबरोबर त्याच्यावर देखील चित्रीत करण्यात आला होता. 'आइए मेहरबां' हे आशाबाईंचे गाणे क्लब संगीताच्या वळणाने जाणारे एक मादक नृत्यगीत होते आणि ते मधुबालावर चित्रीत करण्यात आले होते. *फागुन*नंतर मधुबालाचे सौंदर्य ओ. पी. नय्यरनी या चित्रपटात पुन्हा आशाबाईंच्या आवाजात फुलवले होते. आशाबाईंनी एकटीने गायलेली या चित्रपटातील दोन गाणी हसरत जयपुरींनी व बाकीची गाणी कमर जलालाबादींनी लिहिली होती. दोन गाणी एकटीने गात असताना आशाबाईंनी या चित्रपटातील 'देख के तेरी नजर बेकरार हो गए', 'मुहब्बत का हाथ जवानी का पल्ला सुभान अल्ला', 'गोरा रंग चुनरिया काली मोतियावाली' ही तीन गाणी रफीबरोबर गायली होती. तुमसा नहीं देखा, नया दौर पासून ओ. पी. नय्यर यांच्या संगीतात भांगडा रंगू लागला होता. *हावडा ब्रिज*मधील 'गोरा रंग चुनरिया काली' या गाण्यात हा भांगडा होता आणि मेहमूद व मिनू मुमताज यांनी या गाण्यावर भांगडा नाच केला होता.

नया दौर, बाप रे बाप पासून ओ. पी. नय्यर यांच्या संगीतात टांग्याच्या घोड्याच्या टापांचा ठेका आला होता. हा ठेका हावडा ब्रिजमधील रफीने गायलेल्या 'ईट की दुक्की पान को इक्का कही जोकर कही सत्ता' या गाण्यात आला होता. ओम प्रकाशवर हे गाणे चित्रीत करण्यात आले होते. शक्ती सामंता या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. ओ. पी. नय्यर यांच्या संगीताशी त्यांच्या चित्रपटांचा सूर चांगलाच जुळला होता. *हावडा ब्रिज* या सूराची सुरूवात करणारा पहिला चित्रपट होता.

बारह बजे (१९५८):

*हावडा ब्रिज*मधील ओ. पी. नय्यर यांच्या संगीताचा बाज क्लब संगीताचा होता. हाच बाज असलेला क्लब संगीतातला त्यांचा आणखी एक चित्रपट १९५८ साली पडद्यावर आला होता. हा चित्रपट म्हणजे जी. पी. सिप्पींचा *बारह बजे*.

१९५३च्या *बाज* या चित्रपटाद्वारा गुरूदत्त दिग्दर्शकाचे नट बनले. त्यानंतर १९५७ पर्यंत त्यांनी स्वतःतील नटाला स्वतःच्या गुरूदत्त फिल्मसच्या चित्रपटापुरतेच मर्यादित ठेवले होते. पण १९५८ साली गुरूदत्त फिल्म्सच्या चित्रपटाच्या चौकटीतून बाहेर पडून *बारह बजे* या चित्रपटात त्यांनी भूमिका स्वीकारली. कारण तोवरच्या त्यांच्या एका सहाय्यकाला या चित्रपटात प्रथमच स्वतंत्र दिग्दर्शक बनण्याची संधी मिळाली होती. तो सहाय्यक म्हणजे त्यांची पत्नी गीता दत्त हिची बहीण लक्ष्मी रॉय हिचा पती प्रमोद चक्रवर्ती. जी. पी. सिप्पींनी आपल्या *बारह बजे* या चित्रपटात त्याला दिग्दर्शनाची संधी देताना या चित्रपटातील नायक-नायिकेची भूमिका करण्यासाठी त्याने गुरूदत्त व वहिदा रहेमान यांना राजी करावे अशी अट घातली होती आणि यामुळेच गुरूदत्त यांच्यातील नट या चित्रपटात प्रथमच गुरूदत्त फिल्म्सच्या चौकटीतून बाहेर पडला होता. *बाजी, आरपार, सी. आई. डी., जाल* या चित्रपटातून गुरूदत्तनी त्यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील चित्रपटांची एक चौकट निर्माण केली होती. प्रमोद चक्रवर्तीनी *बारह बजे* हा पहिला चित्रपट याच चौकटीत राहून निर्माण केला होता. यामुळे या चित्रपटातील ओ. पी. नय्यर यांच्या संगीताचा बाज देखील गुरूदत्त यांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील चित्रपटांच्या वळणाने जाणारा झाला होता. गुरूदत्त यांच्या चित्रपटात गीता दत्तचा आवाज प्रमुख आवाज असायचा. आशाबाईंच्या आवाजाने ओ. पी. नय्यर यांच्या संगीताचा ताबा घ्यायला सुरूवात केल्यावर त्यांच्या संगीतातून गीता दत्तचा आवाज हळूहळू कमी होत चालला. तरीही *बारह बजे*मधील त्यांच्या संगीतात मात्र तो कमी झाला नव्हता. आशाबाईंच्या आवाजाला उणे करून गीता दत्तचा आवाजच ओ. पीं.नी. *बारह बजे*मधील आपल्या संगीतातला प्रमुख आवाज बनवला होता. या चित्रपटात एकूण सात गाणी होती. या सातपैकी चार गाण्यात गीता दत्तचा आवाज होता. 'अरे तोबा ये मेरी अदा', 'कैसा जादू बलम तूने डाला', 'तुम जो हुए मेरे हमसफर', 'नहीं तुमने हमे पहचाना' ही चार गाणी गीता दत्तने या चित्रपटात गायली होती. गीता दत्तच्या आवाजात एक नटखट नजाकत होती आणि तिच्या आवाजातील या नटखट नजाकतीचा सूर ओ. पी. नय्यर यांच्या संगीताला अचूक सापडलेला असल्यामुळे नय्यरी संगीतातही गाणी चांगलीच रंगली होती. या चित्रपटातील 'सैया तेरी अंखियों में दिल खो गया' हे गाणे शमशादने गायले होते. नय्यर यांच्या संगीतातील शमशादच्या गाण्यांत एक ठसका असायचा. *बारह बजे*मधील शमशादच्या गाण्यातही ठसका होता. 'मैं खो गया यहीं कहीं यहां है जवां ऋतु शमा हसी', 'अजी वो सुनो तो' ही या चित्रपटातील गाणी रफीने गायली होती.

या चित्रपटातील शमशादचे एक गाणे साहीरनी लिहिले होते. बाकीची गाणी मजरूहनी. •